सोलापूर महानगरपालिका,

लोगो

जा.क्र.सआस/कक्ष.१/आस्था.१/८२८
सामान्य प्रशासन विभाग
सोलापूर दि.३/०१/२०१९

-जाहिरात-

**Walk - In - Interview**

दि.११-०१-२०१९ वेळ - दुपारी ठिक १२.०० वाजता.

अर्ज करण्याची वेळ :- दि.११/०१/२०१९ सकाळी १०.०० ते १२.०० वाजेपर्यंत

स्थळ :- सोलापूर महानगरपालिका, इंद्रभवन, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, सोलापूर

सोलापूर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील विधान सल्लागार या पदावर उमेदवार निवडीचे अधिकार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३(१) नुसार महानगरपालिकेस निहित आहेत. तसेच आजला सोलापूर महानगरपालिकेचा आस्थापना खर्च ३५% च्या मर्यादेत नसल्याने आस्थापनेवरील रिक्त पदे भरणेस शासन निर्देशानुसार शासनाची पुर्व मंजूरी घेणे आवश्यक आहे. शासन मान्यता घेऊन अधिनियमातील तरतुदीनुसार भरती प्रक्रिया करणेस विलंब लागणार आहे. यास्तव सोलापूर महानगरपालिकेतील विधानसल्लागार हे रिक्त पद करारपध्दतीने सहा महिन्याच्या कालावधीकरिता दरमहा एकवट मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात भरणेकरिता खालील शैक्षणिक पात्रता प्राप्त उमेदवारांकडून **Walk - In - Interview** करीता अर्ज मागविणेत येत आहेत.

| अ.क्र | पदनाम | पदसंख्या | शैक्षणिक पात्रता व अनुभव | एकवट मानधन व कामाचे दिवस |
|---|---|---|---|---|
| १ | विधान सल्लागार | ०१(एक) | A Law Graduate with ५ Years practice at the Bar preferably with practice in handling the labour cases | एकवट मानधन रुपये ३०,०००/- (पुर्णवेळ) |

शर्ती व अटी -

१) इच्छुक उमेदवारांनी मुलाखतीसाठी त्यांचे संपुर्ण परिचयपत्र ( Bio-data ),सर्व आवश्यक शै.कागदपत्रांच्या एक साक्षांकित प्रत,दोन पासपोर्ट साईज फोटो व मुळ कागदपत्रे घेवून वरील तारखेस वेळेवर उपस्थित रहावे.

२) उमेदवारांनी मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित राहणेचे आहे.

३) स्थानिक परिस्थितीनुसार अटी व शर्तीबाबत आयुक्त, सोमपा यांचा निर्णय अंतिम राहील.

४) सदरची नियुक्ती ही ठराविक काळाकरिता व एकवट मानधनावर असल्याने नियुक्तीपूर्वी रुपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवर करारपत्र करुन दयावे लागेल.

५) सदरची जाहिरात व इतर शर्ती व अटी सोलापूर महानगरपालिकेच्या www.solapurcorporation.govin या संकेतस्थळावरही प्रसिध्द करणेत आलेल्या आहेत.

(डॉ.अविनाश ढाकणे)
आयुक्त,
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

शर्ती व अटी

१) सदरची नियुक्ती ही तात्पुरत्या स्वरुपात करारतत्वावर व एकवट मानधनावर सहा महिन्याच्या कालावधीसाठी राहिल.

२) सदर नियुक्ती सहा महिन्याच्या कालावधीकरिता केवळ तात्पुरत्या स्वरुपात असून सहा महिनेनंतर केलेल्या कामाचा आढावा घेऊन आवश्यकता वाटल्यास मुदतवाढीबाबतचा निर्णय घेणेत येईल. तसेच दरम्यानचे कालावधीत नियमित विधान सल्लागार ची नियुक्ती झाल्यास कार्यकाल संपुष्टात आणला जाईल.

३) नियुक्तीच्या कालावधीमध्ये निवडीत उमेदवाराने कोणत्याही स्वरुपाचे गैरवर्तन केल्याचे आढळून आल्यास त्यांची नियुक्ती रद्द करण्यांत येईल त्यासाठी नियुक्तीपत्रातील कालावधी बंधनकारक राहणार नाही.

४) निवडीत उमेदवारास नियमित शासकीय कर्मचा-याप्रमाणे अन्य कोणतेही लाभ, सेवेतील वेतनश्रेणी , रजा,पेन्शन इत्यादी अनुज्ञेय असणार नाही, सदरची नियुक्ती करार तत्वावर व फक्त एकत्रित मानधनावर राहील. तथापी प्रत्यक्ष पदास व दैनंदिन भत्ता मनपाचे क्षेत्राप्रमाणे अदा केला जाईल.

५) मा.शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही - २०१०/प्र.क्र.१७/२०००/१२ दि.१ जुलै २००५ नुसार कुंटुंबांची अट लागू असून त्यानुसार दि.२८ मार्च २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असू नये. सदर नियमाचे प्रतिज्ञा पत्र नमुना 'अ' नुसार उमेदवारांने सादर करावयाचे आहे.

६) सदरची नियुक्ती ही तात्पुरत्या स्वरुपात असलेने,महानगरपालिकेच्या सेवेत कायम नोकरी बाबत कोणताही हक्क भविष्यात सांगता येणार नाही अथवा न्यायालयात दाद मागता येणार नाही.

७) निवडीत उमेदवाराने सदरचे नियुक्ती पत्र मिळालेपासून सात दिवसाचे आत कामावर रुजू व्हावे लागेल.सदरचे नियुक्ती पत्र मिळूनही उमेदवार सबळ कारणामुळे वेळेवर हजर होऊ शकत नसेल व ती कारणे मा.आयुक्त सोलापूर महानगरपालिका यांचे समाधान करु शकत नसतील तर त्याचे नांव निवड यादीतून कमी करण्यांत येईल व त्यानंतर नेमणूकी बाबत त्यांच्या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

८) विधान सल्लागार या पदासाठी अर्ज करण्यासाठी कमाल वयोमर्यादा खुल्या प्रवर्गासाठी ३८ व मागासवर्गीयासाठी ४३ अशी आहे.

९) नियुक्तीपूर्वी रक्कम रु.१००/-च्या स्टॅम्प पेपरवर उपरोक्तप्रमाणे शर्ती व अटी मान्य असले बाबत प्रतिज्ञापत्र तयार करुन दयावे लागेल

(डॉ.अविनाश ढाकणे)
आयुक्त,
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर